
ISSN 2278-9243

# कविता-रती

नोव्हेंबर-डिसेंबर २०२२
वर्ष ३८ वे : अंक १



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

कवी आणि संपादक पुरुषोत्तम पाटील यांच्या स्मरणार्थ
काव्य, काव्यविचार, काव्यसमीक्षा व कविविमर्श यांना वाहिलेले द्वैमासिक

# कविता-रती

संस्थापक संपादक : पुरुषोत्तम पाटील  संपादक : आशुतोष रमेश पाटील

नोव्हेंबर-डिसेंबर २०२२ ▢ वर्ष ३८ वे : अंक १ ला

## लेख

१. संतसाहित्य : अन्वयार्थ आणि अर्थबोध - जी. के. ऐनापुरे २-१५
२. विलास सारंग यांची कविता - विलास पाटील १६-२६
३. अरुणा ढेरे यांच्या कवितांतील काव्यसौंदर्य (क्रमशः) - अरुण ठोके २७-३९
४. सुमती लांडे यांची कविता - कविता मुरुमकर ४०-६०

**मुखपृष्ठ**
कमलाकर पाटील

**प्रकाशक-व्यवस्थापन-अक्षरजुळवणी**
प्रकाश पुरुषोत्तम पाटील

**कार्यालयीन साहाय्य व मुद्रितशोधन**
पंकज माळी

**'कविता-रती'ची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी -**

बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, मुंदडा हॉल, पंचवटी, देवपूर, धुळे

**खातेदाराचे नाव :** सुजय प्रकाशन, धुळे

**खाते क्रमांक :** २०११०७८८३३७ : **ISFC No :** MAHB0000348

**सूचना - ऑनलाईन वर्गणी भरल्यानंतर ९३७२०२०१७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर साधा संदेश पाठवून किंवा व्हॉटसॲप करून सूचना द्यावी व त्यात आपला संपूर्ण पत्ता, वर्गणीचा तपशील अवश्य कळवावा.**

वर्गणी धनादेश वा धनाकर्ष या माध्यमाने देखील पाठविता येईल. धनादेश सुजय प्रकाशन, धुळे या नावाने लिहावा.

**नवीन वर्गणीदर - वार्षिक :** रु. ४००, **द्वैवार्षिक :** ७००, **त्रैवार्षिक :** १०००

**संपर्क पत्ता :** ४ ब, विजय पोलिस वसाहत, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे - ४२४००२



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

# अरुणा ढेरे यांच्या कवितांतील काव्यसौंदर्य

अरुण ठोके

अरुणा ढेरे या मराठीतील एक महत्त्वपूर्ण कवयित्री आहेत. त्यांनी विपुल काव्यलेखन केलेले आहे. त्यांचे 'प्रारंभ' (१९८६). 'यक्षरात्र' (१९८७), 'मंत्राक्षर' (१९९०), 'निजारंन' (१९९४). 'जावे जन्माकडे' (१९९८) व 'निळ्या पारदर्शक अंधारात' (२००४) हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यातील 'मंत्राक्षर', 'निरंजन', 'जावे जन्माकडे' व 'निळ्या पारदर्शक अंधारात' या चार निवडक काव्यसंग्रहांतील कविता प्रस्तुत अभ्यासासाठी निवडण्यात आल्या आहेत. या कवितांतील काव्यसौंदर्याचा शोध घेणे, हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे. कवितेतील सौंदर्यवेध घेणे म्हणजे आशय व रूपदृष्ट्या असलेली वैशिष्ट्यतपूर्णता शोधून त्यातील आनंदाच्या खुणा वाचकांना दाखवून देणे होय. मूलतः आशय व रूप या दोन घटकांना कवितेतून पूर्णतः वेगळे करता येत नाही. याविषयी म. सु. पाटील म्हणतात, ''आशय रूपित असतो आणि रूप आशयपूर्ण असते; रूपाशिवाय आशय नाही आणि आशयाशिवाय रूप नाही; सूक्ष्मातिसूक्ष्म रूपविशेष उलगडून दाखवण्याच्या प्रक्रियेतच आशयाचे सूक्ष्मातिसूक्ष्म पदर उलगडत जातात; उलट आशयाची समृद्धता व्यंजक अभिव्यक्तीविशेषांची म्हणजे व्यामिश्र रूपाशी संबध्द असल्याचे दाखवल्याशिवाय ती जाणवत नाही, असा आपला अनुभव आहे. तेव्हा आशय आणि रूप यांचे अस्तित्व आणि स्वरूप एकमेकांवर अवलंबून असते. कवितेचा रूपशोध हा आशयाच्या शोधावाचून पुरा होत नाही आणि आशयाला प्राप्त होणाऱ्या काव्यात्म रूपाविषयी, सौंदर्यरूपाविषयी बोलल्याशिवाय कवितेविषयी बोलल्यासारखे होत नाही.'' (कवितेचा रूपशोध : १९९९ : ८) या अर्थाने ढेरेंच्या कवितांचा आशय व रूपविशेषांचा शोध घेऊन काव्यसौंदर्याचा आस्वाद घेता येईल. कुंतकाच्या दृष्टीने पहिले तर लौकिक भाषा व शास्त्रव्यवहाराहून भिन्न काव्यभाषा कवयित्री घडवते का? प्रतिभास्पर्शाने घडवलेल्या काव्यभाषेतून सुंदर अर्थाचा प्रत्यय येतो का? या कवितांतून सूचकतेचा प्रत्यय येतो का? नादरूपतेचा प्रत्यय येतो का? आ. रा. देशपांडे यांनी कवितेच्या रूपबंधाला अतिशय महत्त्व दिले आहे. त्यांनी कायिक, नादावर्तनी, तालावर्तनी व शब्दध्वन्यात्मक या रूपबंधाच्या जाणिवांच्या योजनेतून काव्यसौंदर्य निर्माण होत असते; असे म्हटले आहे. याचा प्रत्यय ढेरेंच्या कवितांतून येतो का? हे शोधणे रंजक ठरेल. तसेच त्यांच्या कवितांच्या अर्थात्मक अंगाचा शोध घेणे महत्त्वपूर्ण ठरेल. यासाठी संहितालक्ष्यी दृष्टिकोन केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या कवितांतील आशय, आशयसूत्रे, अनुभव, भावना, विचार, दृष्टिकोन यांचा विशिष्ट मुद्यांच्या अनुषंगाने शोध घेण्यात आलेला आहे.



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

**१. कविताविषयक चिंतनः**

अरुणा ढेरेंच्या कवितांतून कविताविषयक चिंतन व्यक्त करण्यात आलेले आहे. त्यातून कवयित्रीचा कवितेकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. एक सर्जनशील व्यक्तिमत्त्वाला कवितेमुळे धीर, आधार मिळतो; कवितेमुळे आनंदाच्या शक्यता जाग्या होतात. कविता ही एखाद्या मंत्राक्षरासारखी वाटते. किंबहुना ती जीवनाचा मूलाधार बनते, अशा प्रकारचा काव्याशय या कवितांतून प्रत्ययाला येतो. ''कवितेचे मंत्राक्षर हे भाषेमध्ये जगण्याचे अवतरण घडवणारेच असते,..... तीच आवाहकता, तीच भारण्याची शक्ती आणि सृष्टीतल्या चैतन्याचा गाभा सांभाळणारा तोच अपार अवकाश !'' (मनोगत, पृ.५) असे कवितेचे आणि जगण्याचे अतूट नाते आहे. कवितेमुळे भाषेत व जगण्यात चैतन्य निर्माण होते. कविता हा चैतन्याचा मूलाधार होय, अशी भूमिका कवयित्रीने घेतली आहे. तिचे नाते संत कवितेच्या परंपरेशी जुळलेले आहे त्यामुळे अनेकदा जनाबाईंशी सख्य असल्याचा भाव सहजपणे आविष्कृत होतो.

**शब्दानुभूतीः**

शब्दांवर अपार प्रेम व निष्ठा असल्याने या शब्दांमुळे जीवातील कष्ट, दुःख कमी होतील, आनंदाचा पाऊस येईल असा आशावादी सूर व्यक्त होतो. पराभवांचे सल दूर होऊन, आयुष्य अपार होईल किंबहुना, 'एकेकदा खरोखरच वाटतं मला/ की शब्दांच्या काठावर सापडेल काहीतरी/ अगदी आपलं असं/ आणि देवमाणूस होऊन होऊन कुणी सोबत देईल/ स्वतःला मागे ठेवून मग कधीतरी/ पुढे, पुढेही जाता येईल' (पृ.१३) लौकिक जीवनातील व्यवहारांनी दुःखानुभूतीच वाट्याला येतात, सर्जनशील शाब्दिक व्यवहारातून आनंदानुभूती प्रत्ययाला येतात. शब्दांमुळे अलौकिकत्वाचा प्रवासही कधीतरी वाट्याला येईल ही आध्यात्मिक धारणा कवितेतून सहजपणे प्रकट करण्यात आलेली आहे.

'निरंजन'मधील 'एक इवलासा शब्द' या कवितेत शब्दाला छोट्या बालक रूपात व कवितेतील 'मी'ची मातृरूपात योजना करण्यात आलेली आहे. ज्याप्रमाणे आई जन्माला आलेल्या बाळाला लहानाचे मोठे करताना त्याच्यावर प्रेमाचा अविरत वर्षाव करत असते, त्याची काळजी घेते, जपणूक करते. त्याच्या बाळलीलांनी हरखून जाते तशी कवितेतील 'मी' शब्दाच्या अर्थछटांनी मोहरते, तृप्त होते. एका इवलाशा शब्दाच्या मुठीत कवितेचा कधीही नाश न पावणारा प्रहर असेल म्हणून या शब्दाच्या गालांपाशी, डोळ्यांपाशी काळीज ठेवणारी 'मी' भेटते. ती स्वतःला वेडी म्हणवून घेते. शब्दांतून निघणाऱ्या अर्थछटांजवळ काळीज ठेवण्याची वृत्ती सर्जनशील समर्पक वृत्तीच्या व्यक्तित्वाचे दर्शन घडविते. आयुष्यातून प्रिय व्यक्तीच्या जाण्याने झालेल्या दुःखामुळे कवितेत शब्द निपचित पडून राहतात. काही अनुभव शब्दच्छलाच्या पलीकडे राहतात, अशीही वेगळी शब्दानुभूती प्रकट करण्यात आलेली आहे.

'मंत्राक्षर' या काव्यसंग्रहात 'कविता शब्दांच्या, या विभागातील सुमारे वीस



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

कवितांत शब्दाचे महत्त्व, त्यातून निर्माण होणारे अर्थ, शब्दांच्या योजनेतील सूचकता शब्दांमुळेच निर्माण झालेली व एकसंध असलेली सृष्टी आहे. शब्दांचे खेळवणे आहे, शब्दांची उग्रता आहे, सक्षम, जातिवंत वृत्ती, शिकारी कुत्र्याप्रमाणे शब्दांचा माग काढणे आहे. शब्दांचे गुरगुरणे आहे, शब्दांची आसक्ती आहे, तर कधी शब्द 'तो' म्हणजे पुरुष किंवा समाजाचे प्रतीक म्हणून येतो. तर कधी भुकेला बनून येतो. शब्दाला व्यक्तित्व आहे, असे कल्पित घटित 'निर्मनुष्य नवीन वाटेवर' या कवितेत येते. कवितेतील 'मी' म्हणते, 'एका धगधगीत दुपारी मी शब्दाला पाहिल/ नेहमीच्या माळावरून पलीकडे डोंगरात सरकणाऱ्या/ निर्मनुष्य वाटेवर, उचलतांना अनवाणी पावले/ आणि त्याच्यामागे मी धावत सुटले/ ...रक्त लागून त्याच्या पावलांचे, लाल गुलाबी झालेले/ केवढे तरी सुंदर दगड मी वेचले/ आणि बाभळीच्या काट्यांवर अडकलेले त्याच्या अर्थाचे असंख्य तुकडे/ दूरपर्यंत दोन बाजूला फरफरत राहिले' (पृ. ११४)

शब्दाची अनावर ओढच त्याच्यासाठी व्याकुळ व्हायला भाग पाडते. शब्दाला असे जिवंत मानणे लौकिक अर्थाने शक्य नाही. मात्र ढेरेंच्या कवितेतील आशयाची निकड म्हणून शब्दाला जिवंत व्यक्तित्व बहाल केले जाते. शब्दाचे माणसाप्रमाणे वावरणे, त्याचे जखमी होणे या घटना प्रतिकात्मकरीत्या येतात. ही प्रतिकात्मकताच काव्यात्मक विधानांच्या निर्मितीला कारणीभूत ठरते. त्यातून कवितेत अर्थसौंदर्य निर्माण होते. समकाळात 'शब्दप्रामाण्य' या वृत्तीच्या होत असलेला ऱ्हासाकडे लक्ष वेधण्यासाठी अशी काव्याभिव्यक्ती घडविण्यात आलेली आहे असे वाटते. शब्दाचे जखमी होणे व त्याचे रक्त सांडलेल्या सुंदर दगडांना कवितेतील 'मी' ने वेचून घेणे म्हणजे मूल्ययुक्त अर्थभान असलेल्या शब्दाला आपलेसे करणे होय. हे घटित अतिशय महत्त्वपूर्ण आहे. अशा मूलयुक्त शब्दामुळेच कवितेची निर्मिती व थोरवी आकाराला येणे शक्य होते. असा शब्दानुभूतीचा विलक्षण विरळा अनुभव ढेरेंच्या कवितांतून प्रत्ययाला येतो. कवितेच्या निर्मितीचे पहिले पाऊल 'शब्द' होय आणि अंतिम शब्दच असतो, हे भान मराठी कवितेच्या चिंतनविषयक आकलनात भर घालणारे आहे.

कविता हे गूढ आहे. तिची निर्मिती, भाषा किंवा रूप हे मंत्रांतील अक्षरांप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे मंत्रोच्चार केल्याने देवकृपादृष्टीचा वर्षाव होतो, अशी परंपरागत समजूत आहे. तसेच दुःखाचे, रोगाचे निवारण होते या धारणांप्रमाणे शब्दांच्या विशिष्ट योजनेतून जी काव्यनिर्मिती होते ती मंत्राक्षरांप्रमाणे असते, कवितेतून अशा अर्थाचे संसूचन झालेले आहे. कविता व्यावहारिक जगातील दुःखाचे, आसक्तीच्या रोगाचे निवारण करण्यासाठी कारक ठरते. असा काव्याशय सूचकतेने मांडण्यात आलेला आहे.

कविता व जीवन यांचा परस्पर अनुबंध उलगडताना घेतलेल्या आत्मशोधातून मानवी अस्तित्वाचा अन्वयार्थ लावण्याच्या प्रयत्नातून काव्यनिर्मिती झालेली आहे. या काव्यनिर्मितीच्या 'मंत्राक्षरां'चे कवयित्रीला अप्रूप आहे. कवितेतील 'तू' ही कविता आहे.



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

तर 'मी' ही कवितेतील विषयवस्तूंचे कथन करणारी स्त्री आहे. कवितेला जीवित मानून तिच्या व्यक्तिमत्त्वाशी तादात्मीकरण पावलेली अनुभूती म्हणजे मंत्राक्षरावस्था होय. या अवस्थेतूनच ढेरेंच्या कवितांची निर्मिती झालेली आहे.

**२. कवितेतील 'मी':**

अरुणा ढेरे यांच्या कवितांतून 'मी'ची विविध रूपांत योजना करण्यात आलेली आहे. उपरोक्त चारही काव्यसंग्रहांत अनुभवांच्या आविष्करणाची अपरिहार्यता म्हणून 'मी'च्या विविध रूपांची निपज झालेली आहे. कवितेतील 'मी' कवयित्रीच्या संज्ञेचाच आविष्कार आहे. ''कवितेतील व 'मी'चा वास्तवातील लौकिक कवीशी अर्थाअर्थी संबंध नसतो. आधुनिक परिभाषेत सांगायचे तर सर्वच प्रकारच्या कवितेतील 'मी' हे एक काव्यात्म संरचित (poetic construct) असते. हा 'मी' कवीचा एक मुखवटा (persona) असतो..... कवितेतील 'मी' म्हणजे लौकिक कवी नव्हे, अशीच भूमिका घ्यावी लागते. तसे जर केले नाही, तर चरित्रात्मक समीक्षा महत्त्वाची ठरेल आणि मुख्य म्हणजे कविता आणि प्रत्यक्ष जीवन यांमध्ये कोणतेही अंतर राहणार नाही.'' (पृ.१३) हा दृष्टिकोन अंगीकारून ढेरेंच्या कवितांतील 'मी'च्या विविध रूपांचा शोध घेऊ. अरुणा ढेरे या आत्मनिष्ठ स्वरूपाचे काव्यलेखन करणाऱ्या कवयित्री आहेत. त्यांच्या कवितेचे आशय व रूपसौंदर्य अनुभवण्यासाठी 'मी'च्या विविध रूपांचा प्रत्यय घेणे आनंददायी ठरेल. ढेरेंच्या कवितांत 'मी'ची योजना कशा प्रकारे करण्यात आलेली आहे? त्यातून कोणते गुणविशेष प्रत्ययाला येतात? 'मी' च्या घडणीवर प्रभाव टाकणारे घटक कोणते आहेत? 'मी'च्या योजनेतून ढेरेंची शैलीविशिष्टता कशी प्रत्ययाला येते? या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध घेवू. ढेरेंच्या कवितांतील 'मी' बहुतांश स्त्रीरूपात व क्वचित पुरुषरूपात अवतरतो. 'मी'ची विविध रूपे खालीलप्रमाणे आहेत.

**संवेदनशील व सृजनक्षम 'मी':**

भोवतालच्या घटना-प्रसंगांनी मनाच्या पातळीवर आंदोलित होणारी, निसर्गरूपाशी एकरूप होणारी, हळूवारपण जपणारी, सतत आत्म व आत्मेतर घटकांशी भावनिक साद घालणारे संवाद करणारी संवेदनशील 'मी' पुन्हा-पुन्हा भेटते. निव्वळ एक क्षणही कवितेतील 'मी'च्या कुतूहलाचा विषय होतो. एक क्षणाला अनुभवण्याची असोशी तीव्रतेने व्यक्त होते. 'क्षण' ही अत्यंत तात्कालिक बाब. स्पर्शहीन गोष्ट. अनुभवणारा अनुभवत असतानाच जुना होतो. कवितेत क्षणाची तुलना मृत्यूशी केलेली आहे. क्षणाला शब्दांच्या चिमटीत पकडण्याचा हा प्रयत्न पहा, 'पकडता येईल का मला हा क्षण मृत्यूसारखा?/ प्रत्येक उलटणाऱ्या दिवसागणिक, तासागणिक, निमिषागणिक/ मी वागवते आहे जसा मृत्यूचा ठसा खोलवर/ श्वासागणिक माझ्या, जसा त्याचा वास हलतो आहे खालीवर,/ माझ्या गळत जाणाऱ्या इच्छा,माझे मोहरणारे निरोप,/ माझे सावकाश शरण जाणे जीवनाला,/



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

माझ्या रक्तात विरघळून चाललेले हताश कैफ-/ इतक्या तीव्र धारेने धरता येईल का क्षण माझ्या काळजावर?' (पृ.५७) असे 'मी'च्या व्यक्तित्वाचे विशेष 'क्षणा'वर आरोपित करून त्याला काव्यविषय वस्तू बनविणे हे संवेदनक्षम व सृजनशील मनाचेच द्योतक आहे. क्षणाला अज्ञाताचा काटा फुललेले टपोरपण, पिकलेपण म्हणणे किंवा त्यातील शोकमग्न रसाळपण जाणवणे व ते पकडण्यासाठी अट्टाहास करणे असे चमत्कृतीपूर्ण वर्णन येते. 'मी'च्या अपरिहार्य संवेदनशीलतेमुळे 'मी'ला जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यातून निर्माण होणारे गुंते नेटाने सोडवून कुंद ओल्या जगण्यातून एकाकीच दूरपर्यंत अनवाणी चालत जाण्याची इच्छाही बोलून दाखवते. एकाकीपणे हे दूर जाणे तेजस्वी कारुण्याच्या गाभाऱ्यात जाण्यासाठी असते. करुणेने भरलेले हृदय ही अस्सल प्रतिभावंताच्या व्यक्तिमत्त्वाची खूण होय. अशी सृजनक्षम 'मी' अस्वस्थ शब्दांचे शांतवन करण्याचे स्वप्न पाहते. आणि प्रेमाच्या पहिल्या उच्चाराइतकी उत्कट नवनिर्मिती करून भोवतालच्या कोलाहलातही 'कविते'ला जपून पुढे नेण्याची ग्वाही देते. यासाठी आपल्या सर्व सुखांना तिलांजली देवून ईश्वराला शरण जाते. ज्ञात नसलेली दुःखेही प्राणांत जागे होवोत व करुणेचा दीप आपल्या शब्दांत लागावा यासाठी करूणाष्टक रचते. सृजनक्षम 'मी'चे वेगळे रूप 'मंत्राक्षर'मधील 'आदिमाया' या कवितेत प्रत्ययाला येते. शब्दामुळे सृजन शक्य होते. शब्द वगळला तर नवनिर्मिती अशक्यप्राय होय. म्हणून शब्दालाच सखा, प्रियकर वा सर्वस्व मानण्यात येते. शब्दामुळेच सत्य व नीती आहे. म्हणून शब्दाला व्यक्तिरूपात पाहून स्वतःला आदिमाया, लज्जागौरी म्हणवून घेणारी 'मी' संवेदनशीलतेचा नवा आयाम समोर ठेवते.

**बालपणीच्या स्मरणरंजनात रमणारी 'मी':**

सर्जनशील निर्मिती करणाऱ्या 'मी'चे मन हे संवेदनशील असते. अशा संवेदनशीलतेमुळे 'मी'च्या जडणघडणीतील बालपणीचा कालावधी अतिशय महत्त्वाचा असतो. एरवी प्रत्येक व्यक्तीच्या जडणघडणीसाठी बालपणीचे अनुभव महत्त्वपूर्ण ठरत असतात. अरुणा ढेरेंच्या कवितांतील 'मी'ची जी विविध रूपे आहेत त्यात बालपणीच्या स्मरणरंजनात रमणारी 'मी' हे एक रूप आहे. या 'मी'च्या बालपणीचे दिवस हरवल्याची खंत खालीलप्रमाणे व्यक्त होते.

'वाळवणाऱ्या रांगोळ्यांनी भरलेली अंगणच नव्हते/ तर हळद मसाल्याच्या वासांनी घमघमणारे/ उन्हाळे देखील उचलून गेले जात्या दिवसांनी/ वाळ्याची नाजूक मूळं खेळवताना.../ अजून जरी निथळत्या चवीचं होत असलं पाणी/ तरी हाकेच्या अंतरावर बाळपण मात्र असत नाही/ दूर अगदी दूर असतं निबर होत जाणाऱ्या कितीक वर्षांनी' (पृ.८८)

गृहिणी उन्हाळ्यात विविध प्रकारचे पापड, कुरडाया, मिरची व मसाले तयार करण्याची कामे करीत असत. त्यासाठी काही पदार्थांना प्रथम उन्हात टाकले जाई त्यालाच वाळवण घालणे म्हणतात. या वाळवणांना असलेले रंग पाहून 'मी'ला त्या रांगोळ्या



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

वाटणे, उन्हाळ्याचे हळद-मसाल्याचा वासांनी घमघमणे आजही आठवते. 'मी'च्या बालपणीच्या खूप साऱ्या सुखद आठवणी या उन्हाळ्याशी जोडलेल्या असाव्यात. आई-आजीचा प्रेमळ सहवासही त्याचाच एक भाग होय. पाणी थंड करणारा वाळा ही अशीच एक सुखद स्मृती जागृत करणारी वस्तू होय. वरील वर्णनातून बालपणीचे विविध रंग, ओलावा गारवादर्शक प्रतिमांतून सुखद अनुभूतीचे आविष्करण सूचकतेने करण्यात आले आहे. शेवटच्या ओळींतून गेली कित्येक वर्षं निब्बर होत गेल्याचा उल्लेख येतो. म्हणजेच बालपणीची कोवळीकता, हळुवारता आजही 'मी'ला हवीहवीशी वाटते. म्हणून ती बालपणीच्या सुखद स्मरणरंजनात रमते.

'निरंजन'मधील 'कुंभमेळा' या कवितेतही आपल्या बालपणातून भटकणारा एकही डोंबारी, मदारी आणि जादूगार नंतर कधीही मला भेटला नाही, अशी 'मी'ची तक्रार येते. प्रौढ होतांना आयुष्याच्या विविध वळणांवर असंख्य नव्या वाटांनी पुढचे मार्गक्रमण करावे लागते. यामुळे आपण बालपणीच्या त्या सुखद घटितांपासून स्वाभाविकपणे दूरच जात राहतो. अगदी मागे वळून पाहिले तरी पहिले सारे तसेच पुन्हा भेटू शकत नाही ही खंत व्यक्त होते. या बालपणीच्या सुखद स्मृतींचा कुंभमेळा पुन्हा भरेल का? बारा वाटांनी उधळून दिलेले, गूढ नाहीसे झालेले सुखद क्षण पुन्हा उमलून आले तर जीवनाकडे लहान बालकाच्या 'स्वच्छ' डोळ्यांनी म्हणजेच पूर्वग्रहविरहित, निर्मळ दृष्टीने पाहता येईल असे भाबडे स्वप्न 'मी'ने रंगविले आहे. यातून कवयित्रीची बालपणीच्या अनुभवांप्रती असलेली ओढ, आत्मीयता दिसते. शैशववृत्ती जपणे म्हणजे कवीचा बाणा होय ही बाब येथे लागू पडते.

**अस्वस्थ, दुःखी 'मी':**

'मी'ला भौतिक जगातील घटनाप्रसंगांनी थकवा येतो. स्वार्थी मनोवृत्तीमुळे जवळपासची माणसं परकी वाटू लागतात. असल्या वागण्याच्या प्रवृत्तीमुळे संवेदनक्षम 'मी'ला अस्वस्थ वाटू लागते. मोकळ्या वातावरणात गेल्यावरही न वारा जाणवतो ना एखादा ढग दिसतो. संपूर्ण वातावरणात पोकळी भरून तगमग असल्याची अनुभूती येते. या वर्तमानात आपण कोंडले गेलो आहेत. यातून सुटकेची एकही वाट नाही असा अस्वस्थ भाव व्यक्त होतो. या क्रूर दिवसांतून बाहेर पडण्यासाठी दमदार तरुण स्वप्न मिळेल का? असा प्रश्न उपस्थित केला जातो. अशा स्थितीत दिवसही लांबलचक वाटू लागणे स्वाभाविक ठरते. दुःखी, कष्टी 'मी' म्हणते की, 'संध्येच्या उजाड माळरानावर आले आहे मी/ गलितगात्र निस्त्राण' (पृ. ५७)

शहरात आपण एकाकी आहोत असे 'मी'ला वाटते. शहरातील वाढलेले प्रदूषण, धुराचे काळे लोट जणू सृष्टीच्याच मरणाचा वास होय. शहरातील माणसांच्या व्यवहारातील तत्त्वच्युती, निष्ठापूर्वक जीवन जगण्याचा अभाव भयभीत करणारा आहे. ही सामूहिक तडफडट भयंकर आहे. माणसांकडून माणसांचा वाढलेला द्वेष-मत्सर माणसालाच आगतिक



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

करत असून ही जगण्याची प्रचंड घरघर मनावर विपरीत परिणाम करणारी ठरते. उदाहरणार्थ, 'भयचकित थांबले आहे मी / इथे, शहराच्या आ वासलेल्या तोंडाशी/ माझे तर तळपाय अजून ओले ओले/ मी जिथून भटकत आले पाऊसवाटांनी हिरव्यागार/ तिथल्या रानगवताचे तरतरलेले/ केसांवर अजून सांडले आहेत पराग जर्द पिवळे/ आणि हात नव्या किणकिणत्या बांगड्या भरलेले/ आता काय होईल? / खरेच, आता काय होईल?' (पृ.३७)

'मी'ला या शहराशी, इथल्या माणसांच्या विसंगत जीवनव्यवहाराशी जुळवून घेणे कठीण होते म्हणून कवितेच्या शेवटी या शहराचे काय होईल? हा प्रश्न उपस्थित होतो. समकाळात शहरांचे जे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत त्या वास्तवाकडे अंगुलीनिर्देश करण्याचा हा वेधक प्रयत्न म्हणता येईल.

'मी'च्या दुःखी होण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील ठळक कारणे असलेल्या बाबींचा सूचक उल्लेख कवितेच्या आशयातून येतो. नात्यातील व्यक्तींच्या वागण्याने दुःखी झालेली मी, महानगरीय वास्तवाने दुःखी झालेली मी, मातृत्वाच्या पश्चात्तापाने दुःखी झालेली मी, इतर स्त्रियांच्या दुःखाशी तादात्म्य करून घेणारी मी, तर कधी काव्यनिर्मिती थांबल्याने दुःखी झालेली मी अशी 'मी'च्या दुःखीपणाची अनेक रूपे कवितांतून पाहायला मिळतात.

**आशावादी व आदर्शवादी 'मी':**

कवितेतील 'मी'च्या आयुष्यात आलेली दुःखाला सोसण्याची अंगभूत शक्ती ही तिच्यातील प्रामाणिकपणातून उगवत राहते. प्रसंगी संघर्ष करण्याची वेळही आली तर तिची तयारी असते. 'पर्याय' कवितेतून दुःख देणाऱ्या व्यक्तीलाच ती आव्हान देते. दुःखाने रडत कुढत बसण्याऐवजी सुखाचा पर्यायी मार्ग शोधते. यातून तिची जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक वृत्ती लक्षात येते. हा सुखाचा पर्यायी मार्ग म्हणजे तिच्यातील व त्याच्यातील वाढलेले अनिश्चित अंतर सत्कृत्यांनी भरून काढणे होय. 'मी'ला उजेडाची ओढ आहे. येथे उजेड हे ज्ञानाचे प्रतीक म्हणून येते. ही ज्ञानाची ओढच 'मी'ला अधिक संतुलित व आशावादी बनवते. आपल्यावर झालेल्या अन्यायातून मार्ग काढण्यासाठी 'शब्द' हा पर्याय असल्याचे ती नमूद करते. शब्दामुळेच दुःखाला पेलण्याची शक्ती प्राप्त झाल्याची अनुभूती तिच्या सृजनक्षम आशावादी 'मी'चे निदर्शक ठरते. सकारात्मक वृत्तीतून वाढलेल्या सोशिकतेमुळे, आज भोगलेल्या दुःखातून उद्याचा दिवस दुसरा आणि वेगळा असेल हा आत्मविश्वास प्रकट करते. यासाठी 'मी' प्राणांचे स्वातंत्र्य व जन्मांचे शकुन मुकाटपणे धरून ठेवल्याचे नमूद करते. सर्व गोष्टींचा जसाच्या तसा स्वीकार करून स्वतःची गळालेली पिसेही जपून ठेवते. कारण उद्याचा दिवस दुसरा आणि वेगळा असेल असा आशावाद व्यक्त करते.

स्वतःचे अस्तित्व सहज आंधळेपणाने नष्ट होणार नाही याची काळजी करणारी आदर्शवादी 'मी' 'मृण्मय वेदनेच्या कळशीत' या कवितेत भेटते. फूल म्हणून जगणे अवघड

झाले तर दृष्टीच्या पलीकडे सुगंध होऊन जगेल. पिसाट काळा वारा वातीला झोंबू लागला तर निद्रेच्या स्वप्नातील उजेड बनून राहील. शेवटी मातीखालची गडदभूल ओलच बनून जाईल, किंबहुना काळजाजवळ पसरवणारा शब्दच होऊन जाईल, अशी स्वयंप्रेरणेने भारलेली वल्गनाच करते. यातील फूल-सुगंध, वात-उजेड, दिवस-प्रहर, कळशी-पाणी, माती-ओल, काळीज-शब्द ही शाब्दिक युग्मे आशयाची निकड म्हणून येतात आणि अभिव्यक्ती विशिष्टतेच्या सौंदर्याची उपज बनून राहतात.

**आत्मसंवादी, तटस्थ 'मी':**

अरुणा ढेरेंच्या उपरोक्त चारही काव्यसंग्रहांतून प्रगल्भ आत्मनिष्ठ जाणीवेच्या अनेक कविता वाचायला मिळतात. आंतरिक जाणिवांनी भारलेल्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष म्हणजे आत्मसंवादी वृत्ती होय. बाहेरील जगात घडणाऱ्या प्रसंगांना प्रतिसाद देताना तसेच अंतर्मनात घडणाऱ्या मानसिक संघर्षाला शब्दरूप देण्यासाठी आत्मसंवादी वृत्ती उपकारक ठरत असते. अशा आत्मसंवादी 'मी'चे अनोखे दर्शन 'शपथेवर' या कवितेत घडते. 'मी'चा आत्मसंवाद हा स्वतःच्याच गत आयुष्याकडे नव्या दृष्टीने पाहण्यासाठी झालेला आहे. यात बालपणीच्या सुखद स्मृतींना उजाळा देण्यात येतो तर कवितेतून सृष्टीच्या गाभ्याला भिडण्याची जिज्ञासा व्यक्त होते. हेव्या-दाव्यांचे विषारीपण बाजूला सारून शुध्द आपुलकीच्या उगमापाशी पोहोचता येईल असा विश्वास व्यक्त होतो. जीवनातून हरवत चाललेली निरागसता व शांततेपर्यंत जाता येईल, परागंदा झालेले उत्कट प्रेम पुन्हा भेटेल, विश्वासार्हता व दयाबुध्दी टिकेल, हे सर्व एखाद्या कवितेतून घडेल आणि 'मी' मलाच भेटेल, मैत्रिणीच्या शपथेवरच्या गुपितामधून आताच भेटल्याप्रमाणे ही सर्व कल्पित घटिते 'मी'च्या आत्मसंवादी वृत्तीतून आकाराला आलेली आहे.

हा 'मी'चा आत्मसंवाद इतरांना वेदना, दुःखांना साकारण्यासाठीही घडत राहतो. माणसांच्या वागण्याच्या नाना तऱ्हा ती अनुभवते. हे जगणे कवितेतून मांडण्यासाठी चिखलातील बियाण्याप्रमाणे शब्दाच्या तळातून 'मी' फुटत चालली आहे. ही कबुली 'बियाणे' या कवितेत देते.

स्वतःच्याच जीवनाकडे तटस्थपणे पाहणारी 'मी' कवितांतून भेटते. उदाहरणार्थ, 'मनाच्या तावदानावरून' या कवितेत एकटेपणाच्या अनुभवाकडे तटस्थपणे पाहिले जाते. मनातील अनेक कढ मोकळे होतात. सुटलेला धीर गोळा केला जातो. बालपणीचे जीवन अधिक तीव्रतेने जगल्याची अनुभूती आठवते, त्यातून प्रेरणा घेवून नव्या उमेदीने जगणे सुरू करण्याची इच्छा होते. स्वतःशीच संवाद करीत स्वतःचेच केलेले हे तटस्थ वर्णन पहा. 'स्वतःची स्वतःशी भेट/ नसते एवढी तुडुंब नेहमीच/ म्हणून मी काठोकाठ भरून जाते/ सुख म्हणता येईल अशा निळ्या दुःखाने/ भुरूभुरू गळत राहतो एकटेपणा/ मनाच्या तावदानावरून संथपणे.' (पृ.९३) यातून 'मी'च्या आत्मसंवादी व तटस्थ वृत्तीचा अभिनव प्रत्यय येतो. स्वतःची स्वतःशी तुडुंब भेट होणे हा आनंदक्षण मात्र सुख म्हणता येईल अशा



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

निळ्या दुःखाने हे काठोकाठ भरून येणे, ही सुख-दुःखाची विसंगत सांगड सुसंगतपणे घडवून आणण्यासाठी 'मी' कडे असलेली तटस्थ वृत्तीच कारणीभूत ठरते. ढेरेंच्या कवितेतील असे विरोधाभासी चित्रण आशयाला उठाव प्राप्त करून देते. हे त्यांच्या काव्यलेखनशैलीचे वेगळे वैशिष्ट्य आहे.

**ईश्वराशी संवादी 'मी':**

ढेरेंच्या कवितांतून ईश्वराचे अस्तित्व आहे. ईश्वरच सृष्टीचा नियंता आहे. त्याच्या नियंत्रणाने सर्व गोष्टी होतात अशी विचारबीजे आढळतात. यासाठी विठ्ठल व शंकर या देवांशी संवाद तसेच संतकवींशी संवाद करण्यात आलेला आहे. कवितेतील 'मी'ची जडणघडण आध्यात्मिक वातावरणात झालेली असल्याने पाप-पुण्याच्या कल्पनांचाही तिच्या भावविश्वावर प्रभाव पडलेला दिसतो. साधी जुईची वेल आपल्या हातून तुटली, याला कित्येक वर्षे झाली तरी अजूनही आपल्या मनात ती वेल तुटल्याची जमीन दुखत असल्याचा सल ती ईश्वराला बोलून दाखवते. स्वतःला ऐलपैल वाढवत नेण्यासाठी मिळालेला अवसर म्हणजे मला ईश्वराचेच सांत्वन आहे असे म्हणणारी 'मी' 'सांत्वन' या कवितेत भेटते. तर 'साखळी' या कवितेत ईश्वराच्या अस्तित्वाचे अनेक दाखले दिलेले आहेत. उदाहरणार्थ, 'मी ऐकते तू झांजावतांना पाण्याचा जगदंबनाद/ पाहते तुला भास्मांगराग धुके होताना/ सावल्यांचे निर्गुण आत्मे वितळवताना पाहते तुला/ पाहते पांडुरंग आभाळ जन्मताना, निळावताना' (पृ.९८)

निसर्गातील विविध विभ्रमांतून ईश्वराचे दर्शन होते, असा अनुभव प्रस्तुत ओळींतून व्यक्त झालेला आहे. ईश्वराचे असे अनुभव सांगणारी 'मी' ईश्वरकृपेने भिजून जाते, स्वतःपासून स्वतःच वेगळी झाल्याची अनुभूती कथन करते. स्वतःच्या मोड-घडीतही ईश्वराचा अंश असल्याचे ईश्वराला सांगते. तसेच 'नीलकंठ' या कवितेत ईश्वराच्या अस्तित्वाचे पुरावे देता येणार नाहीत मात्र पुढच्याच क्षणी त्याचे अस्तित्व असल्याच्या पुष्कळ गोष्टी दाखवता येतील हा आत्मविश्वास व्यक्त करणारी 'मी' भेटते. 'रस्त्यावर उभी राहून' या कवितेतील 'मी' विठ्ठलाशी जो संवाद करते त्याचे वर्णन आलेले आहे. या संवादातून समकाळात धर्मव्यवस्थेवर निर्माण झालेल्या ताणाचे संसूचन करण्यात आलेले आहे. तसेच 'प्रार्थना' या कवितेतून ईश्वरी कृपेने सृष्टीचे भले करण्याचा आशय शब्दांकित करण्याची शक्ती प्राप्त व्हावी, असे मागणे ईश्वराकडे मागण्यात आलेले आहे.

अरुणा ढेरेंच्या कवितांतून स्वप्नवेडी 'मी', समकाळात शब्दांच्या शक्तीहीनतेची जाणीव करून देणारी 'मी', गूढ-आध्यात्मिक शक्तींशी एकरूप होणारी 'मी' अशा 'मी'च्या रूपांबरोबरच संवेदनहीन पुरुषरूपातील 'मी'चीही योजना करण्यात आलेली आहे. तसेच निसर्गाशी एकरूपता साधणारी 'मी'ही विलक्षण आहे. थोडक्यात अरुणा ढेरेंच्या कवितांत 'मी'ची योजना वैविध्यपूर्णरित्या करण्यात आलेली आहे तसेच ती आशय व रूपाची अविभाज्य निकड म्हणून येते.



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

**३. आत्मशोध:**

आत्मसंवादाच्या अनेक तऱ्हांतून कवितांतील आत्मशोध सुरू होतो. 'आपण', 'आपल्या' या संबोधनांतून स्वसंवाद करण्यात येतो. या संवादाचे कधी आत्मचिंतन, बाह्य परिस्थितीविषयीची निरीक्षणे, त्यावरील भाष्य, अंतर्मनातील भाव-भावना, संघर्ष, बौध्दिक पेच व आध्यात्मिक अनुभूतीविषयीचे भाष्य असे वैविध्यपूर्ण स्वरूप आहे. जन्म-मृत्यू विषयीचे कुतूहल हा या आत्मशोधाचा प्रमुख धागा आहे. तसेच मानवी नातेसबंधांविषयीचे कुतूहल व नीतिमान जीवन जगण्याचा अट्टाहास यासाठी कवितेतील 'मी' आत्मसंवादाचा सहारा घेताना दिसतो. 'जावे जन्माकडे' या कवितेत 'मी'ला मानवी जन्माविषयीच्या गूढाचे आकर्षण वाटते. वास्तविक 'जन्म' ही औत्सुक्याची व कुतूहलाची बाब होय. विज्ञान व अध्यात्म या दोहोंनाही तिने आकर्षित केले. त्यातून शोध व चिंतन पुढे आले. सर्जनशील कविमनालाही त्याविषयी कुतूहल वाटणे स्वाभाविक आहे. या स्वाभाविक कुतूहलातून अशक्यप्राय अशा जन्माकडे परत जाण्याच्या घटिताचे वर्णन करण्यात येते. डॉ. सिग्मंड फ्रॉईडने मानसशास्त्रीय विश्लेषणात म्हटले आहे की, आईच्या गर्भाशयात परत जाणे ही सर्वाधिक सुख देणारी बाब असते. व्यावहारिक जगात ही बाब शक्य नसल्याने व्यक्ती मृत्यूचा मार्ग अवलंबतो व त्यातून त्याला सुखप्राप्ती होते. फ्रॉईडने सांगितलेला पहिला मार्ग अशक्य असला तरी सर्जनशील मानवी मनाच्या कल्पनशक्तीच्या जोरावर लेखक-कवी आपल्या जन्मावस्थेविषयीच्या आभासी मार्गापर्यंत पोहोचण्यासाठी शब्दांच्या आधारे, साहित्यनिर्मिती करून अतीव सुखप्राप्ती किंवा आनंद प्राप्त करून घेऊ शकतात. या दृष्टीने पाहिले तर 'जावे जन्माकडे' ही कविता अशाच प्रकारची आनंदानुभूती घेण्याच्या आत्मशोधातून लिहिली गेली आहे असे म्हणता येते. आपल्या सुखाचे आईच्या सुखाशी साधारणीकरण करून केलेले हे वर्णन पहा. 'वेणांच्या असह्य जळावर उमललेले/ पाहिले असेल आईने जर सुखाचे एखादे तरल फुल/ तर त्याचे बियाणे असेलच ना जमिनीत कुठे तरी / मग त्याचे बियाणे असेलच ना जमिनीत कुठे तरी/ मग आदिम वासनांच्या झगझगीत उन्हात/ पाखराच्या टोकर चोचीने त्याचे शोध घ्यावे / जावे जन्माकडे'(पृ.९)

मनाच्या संभ्रमावस्थेमुळे निर्णयक्षम वृत्तीला आलेले अडथळे घालविण्यासाठी अधिभौतिक जगातील गोष्टींचे अप्रूप असलेले स्त्रीमन 'संभ्रम' कवितेतून भेटते. या संभ्रमित 'मी'ला ब्रह्मगुहेचे आकर्षण वाटते. आपण ब्रह्मगुहेत जावे की नाही? याविषयीचा पेचप्रसंग कवितेचा आशय बनून येतो. 'पोथीपाशी ना ज्योतीपाशी' या कवितेतील 'मी' आपल्या जीवनप्रवासाची तटस्थ निरीक्षणे नोंदवतो. आपल्या जीवनातील चढ-उतारांप्रमाणेच संघर्षाची सुरुवात शोधताना ती स्वतःची तुलना नदीशी करते. नदी ही प्रवाही असते. प्रवाहीपण हे जीवनाचे प्रतीक आहे. स्त्री ही नदीप्रमाणेच जीवनाला पुढे नेणारी, प्रवाहित ठेवणारी असते. ज्याप्रमाणे नदी इतरांसाठी आपले सर्वस्व अर्पण करून देते. लाभाच्या गोष्टी देते, त्याप्रमाणे स्त्रीही समर्पण वृत्तीने जीवनाला पुढे नेते. देण्याची वृत्ती तिच्यातही



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

नदीप्रमाणेच आहे. नदीमुळे मानवी वस्त्यांची निर्मिती झाली. किंबहुना नद्यांच्या नावाने संस्कृतीची ओळख करून दिली जाते. उदाहरणार्थ, सिंधू संस्कृती. तसेच स्त्री ही संस्कृतीची निर्माती आहे. कुटुंब स्थापित करणे, शेतीचा शोध लावणे अशा अनेक मूलभूत गोष्टींची उद्गाती स्त्री आहे. स्त्रीची नदीशी केलेली तुलना उद्बोधक आहे. कवितेच्या शेवटी कवितेतील 'मी' भीमा नदीच्या पाण्याशी आपल्या अंतःकरणातील अनुत्तरीत प्रश्नाची तुलना करून त्यातून सुखकारक व सद्भाव असलेले जीवनतत्त्व शोधण्याचा संकल्प मांडते.

भोवतालात घडणाऱ्या दुःखद घटनांनी 'मी'चे मन विदग्ध होते. उदाहरणार्थ, पुराच्या पाण्याने एखादी मानवी वस्तीच वाहून जावी, एखाद्या व्यक्तीच्या अंगावर वीज कोसळून तो जळून मरावा. यामागे काही ना काही कार्यकारणभाव असल्याचे सहज स्पष्टीकरण कुणीही देऊ शकते. मात्र आपल्याला हे दुःख बिनचूक भावनिक शक्तीनिशी मांडता यावे असा शब्द मिळत नसल्याची सल प्रामाणिकपणे व्यक्त करण्यात येते. आजूबाजूला घडणारे अटळ विनाश थोपविणे शक्य नाही मात्र त्यातून निसटलेला एखादा उपाय शोधून स्वीकारण्याचे बळ स्वतःकडेच मागितले जाते.

अंतर्मुख होऊन जीवन जगण्याच्या वृत्तीमुळे कवितेतील 'मी'चा स्वतःशीच संवाद होत राहतो. या संवादाला जीवनातील गतकालीन घटना प्रसंगांची किनार असते. 'एकाकी' या कवितेत जुन्या पुस्तकाच्या पानात ठेवलेल्या सुखद स्मृतींचे प्रतीक नव्या रूपात पहिले जाते. ज्या हृदयस्थ व्यक्तीशी या सुखद स्मृतींचा संबंध असतो त्या व्यक्तीलाही आपल्या आनंदानुभूतीत वाटेकरी करून घेण्यास कवितेतील 'मी' राजी नसते. कारण तिला एकाकी आनंदाचा शोध लागलेला असतो. या एकाकी आनंदाच्या अनुभूतीविषयी ती म्हणते, 'या क्षणी मला केवढी समाधानाची वाटते/ स्वतःच्या अगदी एकाकी आनंदाची चव/ स्वतःलाच फक्त कळते,/ या लहानग्या सत्याचे मला बिलगणे/ केवढे मोलाचें, केवढ्या तोलाचे असते!' (पृ.६५) असे 'स्व'चे वेगळेपण जपण्याची तीव्र असोशी यातून दिसते. आपण इतरांहून वेगळे असल्याचे भान जागे असल्याने लौकिक जीवनातील दुःखदायी प्रसंगांतही धीरोदत्त वृत्ती पुढे येते. 'नात्यांमधून रूजतांना' या कवितेत नात्यांच्या पातळीवरील इतर नात्यातील व्यक्तींवर केलेले निरागस प्रेम, आस्था व प्रामामिकपणा नाते जिवंत ठेवायला कारणीभूत ठरतो. आपले इतरांशी असलेले वागणे हे नात्यांचे बंध अधिक घट्ट करणारे असल्याचा प्रत्यय व्यक्त करण्यात येतो.

आत्मसंवादातून गवसलेल्या सुखकारक गोष्टींपैकी एक म्हणजे काव्यनिर्मिती होय. काव्यनिर्मितीतून कवी कधी कधी मौलिक नवे विचार प्रकट करून जातात. कवितेतील ओळींतून ध्वनित होणाऱ्या अर्थाचे एखाद्या सैद्धांतिक विवेचनाशी साधर्म्य आढळून येते. अशा वेळी वाचकांसाठी हा दुग्धशर्करायोगच असतो. अरुणा ढेरेंच्या 'मंत्राक्षर'या काव्यसंग्रहातील 'अनुच्चारित' ही कविता वाचली की, झाक लाकां या प्रसिद्ध समीक्षकाचे सैद्धांतिक लेखन आठवते. कविता वाचण्यापूर्वी आपण मिलिंद मालशे व अशोक जोशी

यांनी 'आधुनिक समीक्षा सिध्दांत' या ग्रंथात मांडलेले लाकांचे विश्लेषण थोडक्यात पाहू. झाक लाकांच्या मते, 'इगो' हा भ्रमस्वरूप आहे. तो नेणिवेची निर्मिती आहे. नेणीवच सर्व वास्तवाचे मूळ आहे. सर्व 'स्व'चे अधिष्ठान आहे. या स्पष्टीकरणासाठी त्यांनी 'मिरर स्टेज' हा सिध्दांत मांडला. आरश्यात पाहिले असता आपण इतरांहून वेगळे आहोत. बालकाला जेव्हा प्रथम अशा प्रकारची जाणीव होते त्या स्थितीला लाकांने 'मिरर स्टेज' असे म्हटले आहे. 'मिरर स्टेज' मध्ये अहमची घडण होते.

लाकांच्या मते, नेणीव भाषेप्रमाणे घडते. आपले अप्रकट विचार व आपण न वापरलेले शब्द म्हणजे नेणीव होय. आपल्याशिवाय जे असते ते 'अन्य' किंवा 'अदर' होय. त्याबरोबर आपला संवाद चालतो. त्यातूनच नेणीवेचा भाग, नेणीव असलेले 'स्व'चे 'अहम'चे व्यक्तित्व घडते. एकसंध व्यक्तित्त्व हे मृगजळ आहे, असे लाकांने म्हटले आहे. लाकांने व्यक्तिमत्त्वाचे काल्पनिक व्यक्तिमत्त्व व भाषिक व्यक्तिमत्त्व असे दोन भाग केले. खरे व्यक्तिमत्त्व याय दोघांहून वेगळेच असते. ते नेणिवेच्या दमन केलेल्या इच्छांनी बनलेले असते. काल्पनिक वा भाषिक व्यक्तिमत्त्वांनी त्याचा निर्देश होऊ शकत नाही.

लाकांच्या मते, भाषा ही नेहमीच एका नसण्याबद्दल, हजर नसलेल्या गोष्टींबद्दल असते. भाषेतले शब्द प्रत्यक्षातील वस्तू जेव्हा समोर नसते, तेव्हाच वापरले जातात. आपल्या सभोवतालाचे जग जर परिपूर्ण असते तर त्यात सर्व गोष्टी हजर असत्या आणि कोणतीही गोष्ट अनुपस्थित व अनुपलब्ध नसती अशा स्थितीत आपल्याला भाषेची व तिच्यातील शब्दांची गरजच पडली नसती. वास्तव हे भाषेपलीकडे असते, त्यामध्ये सर्व काही मिळते. या वस्तुस्थितीमुळे भाषेत वास्तवाचे दर्शन घडत नाही. वास्तवाचा भाषेशी संबंध जोडू नये, असे लाकांला वाटते. 'स्व'च्या इच्छेशिवाय, 'इतर' या त्याच्या कल्पनेशिवाय, काहीतरी अनुपलब्ध आहे असे 'स्व'ला वाटल्याशिवाय भाषा निर्माण होत नाही. कारण 'स्व'ला केंद्रस्थानी राहायचे असते, भाषा वापरायची असते. जुलिवा क्रिस्तेवा या विदुषीने फ्रॉईड व लाकांच्या विचारांशी सहमती दर्शविली. तिच्या मतानुसार, व्यक्तिमत्त्वाचे निश्चित असे रूप ठरलेले नसते. कुटुंब व समाजाकडून आपल्या इच्छा व वासना नियंत्रित केल्या जातात. एक सामाजिक व्यक्ती म्हणून आपण विशिष्ट रीतीने वागावे, विशिष्ट गोष्टी कराव्यात असे शिकवले जाते. क्रिस्तेवाने व्यक्तिमत्त्वाचे अव्यक्त व व्यक्त असे दोन भाग सांगितले.

थोडक्यात कलाकृती नेणीवेमुळे घडते. कलाकृतीच्या घडणीत नेणीवेचे विशेष महत्त्व असते. यादृष्टीने फ्रॉइडने कलाकृतीचा संबंध दिवास्वप्नांशी जोडला. युंगने सामूहिक व वांशिक नेणीवेशी जोडला तर लाकांने कलाकृतीचे नाते लेखकाच्या विविधस्वरूपी व्यक्तिमत्त्वाशी जोडले आणि कलाकृतीतील पात्रांचाही तसाच विचार केला. लाकांने भाषेचे कलाकृतीच्या घडणीतील स्थान विशद केले. आता आपण 'अनुच्चारित' या कवितेची संहिता पाहू.



REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA

'किती जिवलग असते
एखाद्या सुंदर अनुच्चारित गोष्टीचे
आपल्यासोबत दूरवर येणे !
किती अवघड असते !
उच्चारणाहूनही लोभस
असतात कधी कधी उच्चारणाचे आभास
जीवापासचा भुलवा घमघम उठवायचा
अन् पुन्हा तो कल्लोळ जीवापाशीच रोखायचा,
हळूहळू नादच जळतो या प्राणांतिक आनंदाचा.
ओठ हलवायचा, थांबवायचा
शब्द मनवायचा, मिटवायचा
उन्हात धरलेल्या बोटांमधून झिरपावा लाल उजेड,
तसा त्या अस्तित्वाचा लोभ पसरत राहतो,
अन् कोरांटीच्या तळामधला चुपावासा मध
तसा तगण्याच्या मुळाशी थेंब थेंब गोडवा साठत जातो' (पृ.३६)

प्रस्तुत संहितेत चार कडवी आहेत. त्यातील पहिल्या कडव्यातील वर्णन वाचले की, लाकांचे भाषेबद्दलचे विवेचन आठवावे. या दोन्हींत साधर्म्य असल्याचे लक्षात येईल. यापुढे लाकांच्या सिध्दांताचे उपयोजन करू. पहिल्या कडव्यातील वर्णनातून कवितेतील 'मी'बरोबर 'इतर'च्या प्रतिमेची ओळख होते मात्र तीही अपुरीच आहे. 'इतर'ची दखल घेतली जाते तेव्हा कवितेतील 'मी'च्या काल्पनिक व्यक्तिमत्त्वाची बाजू पुढे येते. तर दुसऱ्या कडव्यातून 'मी'च्या नेणिवेतील गूढ भावनांची व्याप्ती समजते. व्यक्तिमत्व हे मृगजळ आहे असे लाकां का म्हणतो ? हे यावरून लक्षात येईल. तिसऱ्या कडव्यातून 'मी' ने 'अहम'चा घेतलेला शोध पुढे येतो. अहम सुखावेल अशा कृती, उक्तींचा उल्लेख येतो. यातून व्यक्तिमत्त्वाची भाषिक बाजू दर्शविली जाते. परंतु खरे व्यक्तिमत्त्व या दोन्हींहून निराळेच असते. थोडक्यात 'स्व'चा शोध अपुराच राहून जातो कारण इगो हा भ्रमस्वरूप आहे, तो नेणिवेची निर्मिती आहे. कवितेतील 'मी'चा इगो 'इतर'च्या अस्तित्वाने नेणिवेच्या पातळीवर केलेल्या चिंतनातून स्पष्ट होतो. **(क्रमश:)**

**(डॉ. अरुण ठोके, ०६, जे. पी. रो हाऊस, ओंकारेश्वनगर. , अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३. भ्रमणध्वनी क्र. ९१७५१६४७९९.)**


REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA